# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा दि. ११/११/२००८

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा मंगळवार दिनांक ११/११/२००८ रोजी सभा सुचना क्र. १३ दि. ०१/११/२००८ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. महापौर श्री. नरेंद्र मेहता हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रिक्स | -- | सदस्य |
| २) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | -- | सदस्य |
| ३) | श्री. अनिल दिवाकर सावंत | -- | सदस्य |
| ४) | श्री. मिलन वसंत म्हात्रे | -- | सदस्य |
| ५) | सौ. शानु गोहिल | -- | सदस्या |
| ६) | सौ. सुनिता कैलास पाटील | -- | सदस्या |
| ७) | श्री. जुबेर अब्दुल्ला इनामदार | -- | सदस्य |
| ८) | श्री. याकुब कुरेशी | - | सदस्य |
| ९) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | -- | सदस्य |
| १०) | श्रीम. ग्रिटा फॅरो | -- | सदस्या |
| ११) | श्रीम. हेलन गोविंद | -- | सदस्या |
| १२) | श्री. प्रकाश पांडुरंग ठाकूर | -- | सदस्य |
| १३) | श्री. सिंग मदन उदितनारायण | -- | सदस्य |
| १४) | श्री. सिंग श्रीप्रकाश जिलेदार | -- | सदस्य |
| १५) | श्री. प्रविण मोरेश्वर पाटील | -- | सदस्य |

**गैरहजर सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. टेरी पॉल परेरा | -- | सदस्य |

**मा. महापौर :-**

सचिव साहेब मिटींगला सुरूवात करा.

(नगरसचिव यांनी विषय पत्रिकेचे वाचन केले.)

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८५, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २१ पोटकलम (१) अन्वये सन २००८-०९ या सालाकरिता मा. स्थायी समितीवर असणाऱ्या सदस्यांपैकी एका सदस्याची सभापती स्थायी समिती म्हणून नेमणुक करणेबाबत.

(नगरसचिव यांनी शासन जी.आर. चे वाचन केले.)

**नगरसचिव :-**

**मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९/१९४९ चा मुंबई ५९**

क्रमांक बीएनएम. ५००७/४७/प्र.क्र.१५/नवि-३२ - ज्या अर्थी राज्यातील अनेक महानगरपालिकांच्या सार्वजनिक निवडणूका नुकत्याच झालेल्या आहेत; आणि ज्याअर्थी स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समित्या व इतर समित्यांचे सभापती, पदासाठी निवडणूका त्या पाठोपाठ घेतल्या जाणार आहेत आणि ज्याअर्थी, सदर समित्यांच्या सभापती पदांच्या निवडणूकीची विनियमन करणे इष्ट वाटते.

आणि ज्या अर्थी, उपरोक्त प्रयोजनांकरिता नियम करण्यासाठी तत्काळ कार्यवाही करणे आणि त्या प्रयोजनार्थ त्या नियमांच्या पुर्व प्रसिद्धीची शर्थ काढून टाकणे जीमुळे आवश्यक वाटते अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबाबत महाराष्ट्र शासनाची खात्री पटली आहे.

त्याअर्थी आता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९(१९४९ चा मुंबई ५९) चे कलम ४५६ अ, पोटकलम (१) आणि पोटकलम (२) चे परंतुक याद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा व त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून आणि सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा संलेख हे जंथवर उक्त महानगरपालिकेच्या स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती व इतर समित्यांचे सभापती पदासाठीच्या निवडणूका घेण्यासंबंधात लागू असतील तेथवर, त्यांचे अधिक्रमण करून महाराष्ट्र शासन याद्वारे पुढील नियम करित आहे ते असे :-

१. संक्षिप्त नाव - या नियमांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती व इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम २००७ असे म्हणावे.

२. स्थायी समितीचे सभापती या पदाची निवडणूक घेण्यासाठी विशेष बैठक - (१) महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीनंतर तसेच त्यानंतरच्या प्रत्येक वर्षी रिक्त होणा-या जागेवर स्थायी समितीच्या सभापतीची निवड करण्यासाठी महानगरपालिकेने प्रत्येक वर्षी विशेष बैठकीचे आयोजन केले पाहिजे.

२) महापालिका सचिव महापौरांशी विचार विनिमय केल्यानंतर पोटकलम (१) अन्वये विशेष बैठक घेण्यासाठी तारीख निश्चित करीलः परंतु अशा बैठकीची नोटीस बैठकीच्या तारखेच्या किमान पूर्ण तीन दिवस आधी स्थायी समितीच्या सर्व सदस्यांना देण्यात येईल.

३) अशी बोलावण्यात आलेली विशेष बैठक रद्द किंवा तहकूब करता येणार नाही.

३. नामनिर्देशनपत्र सादर करणे :- (१) स्थायी समितीच्या सभापती पदासाठी निवडणूक लढविण्याची इच्छा असलेला स्थायी समितीचा कोणताही सदस्य या नियमांसोबत जोडलेल्या नमुना १ मध्ये आपले नामनिर्देशन, पालिका सचिवांकडे नामनिर्देशनासाठी निश्चित केलेल्या दिवशी जातीने सादर करील.

(२) प्रत्येक नामनिर्देशन पत्रात उमेदवाराचे पुर्ण नाव नमुद केलेले असेल आणि त्यावर एका पालिका सदस्याने सुचक म्हणून व दुस-याने अनुमोदक म्हणून स्वाक्षरी केलेली असेल.

(३) कोणताही पालिका सदस्य एकापेक्षा अधिक उमेदवाराचे नामनिर्देशने सुचित करणार नाही किंवा अनुमोदन देणार नाही.

(४) या नियमाप्रमाणे कोणत्याही उमेदवाराला एकापेक्षा अधिक नामनिर्देशनपत्रे सादर करण्यास प्रतिबंद केला जाणार नाही :

४. पिठासीन अधिकारी - (१) बोलाविलेल्या विशेष बैठकीच्या अध्यक्षस्थानी महापौर किंवा त्यांच्या अनुपस्थितीत उपमहापौर असेल.

(२) जर महापौर किंवा उपमहापौर हे कोणत्याही कारणास्तव त्या बैठकीचे अध्यक्ष स्थान भुषवू शकण्यास असमर्थ असतील, तेव्हा पूर्वगामी उपकलमाच्या तरतुदीप्रमाणे महानगरपालिकेच्या निवडून आलेल्या सदस्यांपैकी ज्येष्ठतम सदस्य त्या बैठकीचे अध्यक्षस्थान भुषवील.

५. नामनिर्देशन पत्रांची छाननी करणे व उमेदवारी मागे घेणे - (१) पालिका सचिवाला, प्राप्त झालेली सर्व नामनिर्देशने बैठकीच्या दिवशी, बैठक सुरू झाल्यानंतर पिठासिन प्राधिका-यांकडे सुपुर्द करण्यात येतील.

(२) पिठासीन प्राधिकारी, अशारितीने प्राप्त झाले या सर्व नामनिर्देशनाची छाननी करील आणि नियम ३ चे उल्लंघन करून स्वाक्षरी केलेली नामनिर्देशने फेटाळता येतील. नंतर पिठासीन प्राधिकारी वैधपणे नामनिर्देशित केलेल्या सर्व उमेदवारांची नावे वाचून दाखवील.

(३) कोणत्याही उमेदवारास, पुर्ववर्ती पोट नियमान्वये यथोचितरित्या नामनिर्देशित केलेल्या पालिका सदस्यांची नावे वाचुन दाखविल्यानंतर १५ मिनिटांच्या आत त्याने सही केलेली लेखी नोटीस, पिठासिन प्राधिका-याकडे देवून त्याची उमेदवारी मागे घेता येईल.

(४) पोटनियम (३) अन्वये आपली उमेदवारी मागे घेण्याची नोटीस देणा-या कोणत्याही व्यक्तीस ती नोटीस रद्द करण्याची परवानगी नसेल.

(५) पिठासीन प्राधिकारी, आपली उमेदवारी मागे घेतलेल्या उमेदवारांची नावे पालिका सदस्यांना (म्हणजे स्थायी समितीच्या सदस्यांना) वाचून दाखवील.

६. निवडणूक प्रक्रीया व निवडणूक निकाल घोषित करणे - (१) जर एकच वैध नामनिर्देशन करण्यात आले असेल तर पिठासिन अधिकारी अशा उमेदवाराची रितसर निवड झाल्याचे घोषित करेल.

(२) जर वैध नामनिर्देशित उमेदवारांची संख्या एकापेक्षा अधिक असेल, तर पिठासीन अधिकारी निवडणूक लढविणा-या उमेदवाराची नावे वर्णानुक्रमे लावतील.

(३) पिठासीन अधिकारी, निवडणूक लढविणा-या प्रत्येक उमेदवाराचे नाव वर्णानुक्रमे घोषित करील आणि हात वर करून दर्शविलेल्या मतांची नोंद घेईल. ज्यांनी त्या उमेदवाराच्या बाजुने मत दिले असेल अशा पालिका सदस्यांची (म्हणजे स्थायी समितीच्या सदस्यांची) नावे कार्यवृत्तात नोंदविण्यात येतील.

(४) पिठासिन अधिकारी पुढील गोष्टींची खात्री करून घेईल :-

(एक) मत देण्या इच्छुक असलेल्या प्रत्येक सदस्याला आपले मत देण्यासाठी रास्त व वाजवी संधी देण्यात आली आहे आणि अशारितीने दिलेले मत ते ज्याला दिले असेल त्या उमेदवाराच्या नावासमोर योग्यरितीने नोंदविण्यात आले आहे.

(दोन) ज्याचे मत एकदा नोंदविण्यात आले आहे अशा पालिका सदस्यास पुन्हा मत देण्याची किंवा आपले मत बदलण्याची मुभा असणार नाही.

(५) पिठासीन अधिकारी ज्यांनी मतदान केलेले नाही अशा सदस्याच्यानावाचीही नोंद करील.

(६) पिठासीन अधिकारी, ज्यांनी मतदान केले आहे किंवा केले नाही अशा सदस्याच्या नावाची नोंद करील आणि निवडणूक लढविणा-या प्रत्येक उमेदवारास प्राप्त झालेल्या मतांची संख्या घोषित करील.

(७) निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवाराला मतदानाद्वारे मिळालेल्या मतांची संख्या घोषित केल्यानंतर पिठासिन अधिकारी निकाल घोषित करण्याची कार्यवाही करील. तद्नंतर उमेदवारांनी मिळविलेल्या मतांच्या संख्येनुसार वाढत्या क्रमाने उमेदवारांची यादी तयार करील. ज्या उमेदवारांला मतदानास सर्वात जास्त मते पडतील तो उमेदवार रितसर निवडून आल्याचे घोषित करण्यात येईल.

(८) मते समसमान मिळाल्यास पिठासीन अधिकारी अस घोषित करील की, निवडणूकीचा निकाल चिठ्ठ्या टाकून सोडतीद्वारे ठरविण्यात येईल. उपस्थित आणि मत देण्यास हक्कदार असलेले पालिका सदस्य बहूसंख्येने ठरवतील अशा व्यक्तीकडून चिठ्ठी काढण्यात येईल.

(९) ज्या उमेदवाराच्या नावाची चिठ्ठी निघेल तो उमेदवार उक्त पदावर वैध रितीने निवडून आला असल्याचे घोषित करण्यात येईल.

(१०) मुक्त व निर्भयपणे निवडणूका पार पाडण्यासाठी पिठासीन अधिकारी कामकाजाची लेखी नोंद घेण्याबरोबर त्या कामकाजाचे व्हिडीओ चित्रीकरणाद्वारे देखील नोंद घेण्याची व्यवस्था करील.

(११) निवडणूक प्रक्रीया पार पाडण्यासाठी आणि बैठकीच्या कामकाजाची नोंद घेण्यासाठी पालिका सचिव पिठासीन अधिकाऱ्यास सहाय्य करील.

७. परिवहन समिती, प्रभाग समित्या आणि इतर समित्यांच्या सभापती पदाच्या निवडणूका - अधिनियम अंतर्गत असलेल्या परिवहन समिती, प्रभाग समित्या आणि इतर समित्यांचे सभापती पदांची निवडणूक प्रक्रीया, स्थायी समितीच्या निवडणूक प्रक्रियेच्या योग्य त्या फेरफारासह लागू राहील.

**नगरसचिव :-**

१ अर्ज आलेले आहेत. पण उमेदवार सहाच आहेत एकूण ७ नामनिर्देशन पत्र आलेले आहेत. ते ती मा. महापौर साहेबांकडे छानणी साठी देतो. सर्वांच्या समक्ष देतो.

**मा. महापौर :-**

एकूण ७ फॉर्म आलेले आहेत. ७ ही वैद्य आहेत असे मी घोषित करत आहे. जर यामध्ये कोणालाही नाव मागे घ्यायचे असेल. तर ११.२९ वा. आहे. तर १५ मिनिटाचा वेळ देतो. नंतर ११.४४ ला घेवू. ११.४४ ला माघार घेण्याचे फॉर्म पिठासीन अधिकाऱ्यांकडे देण्यात आले. सन्मा. सदस्य मॉरस रॉड्रीक्स साहेब या फॉर्मवर तुमची सही आहे का?

**मॉरस रॉड्रीक्स :-**

नाही. माझी सही नाही.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्या शानु गोहिल, ह्या फॉर्मवर तुमची सही आहे का?

**शानु गोहिल :-**

होय. ही माझी सही आहे.

**अनिल सावंत :-**

महापौर साहेब, ज्या उमेदवाराचे विड्रॉ आहे. तो उमेदवारी मागे घेतो म्हणून हे आहे.

**मा. महापौर :-**

उमेदवार सांगतात की, माझी सही नाही.

**अनिल सावंत :-**

उमेदवार सांगतो तर तुम्ही व्हेरीफाय करून बघा.

**मा. महापौर :-**

ज्यांना उमेदवार मागे घ्यायचे आहे त्यांनी अर्ज माझ्याकडे द्यावे. मला त्याबद्दल काही हरकत नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

नाहीतर त्या उमेदवारानी कन्सल्ट द्यायचे की मी उमेदवारी मागे घेतो.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांनी स्वतः लिहून दिलेले आहे.

**शानु गोहिल :-**

त्यांनी लिहून दिलेले आहे तुम्ही सही व्हेरीफाय करा ना.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

नाही. माझी सही नाही.

**ग्रिटा फॅरो :-**

येथे अध्यक्ष हजर आहेत ना. तोंडाने बोलतील तेव्हा ना. त्यांच्या शब्दाने बोलू द्या ना की, मी मागे घेतो म्हणून.

**शानु गोहिल :-**

त्यांनी लिहून दिलेले आहे.

**अनिल सावंत :-**

पिठासिन अधिकारी शासनाचा जो १७ फेब्रुवारीचा जी.आर. आहे. त्याप्रमाणे उमेदवार उमेदवारी घेते वेळी त्याठिकाणी हजर असले पाहिजे.

**मा. महापौर :-**

पण ते नाही बोलतात ना.

**अनिल सावंत :-**

मी तुम्हाला तिन्ही विड्रॉ दिलेले होते. मॉरस रॉड्रीक्स, शानु गोहिल आणि तुळशीदास म्हात्रे.

**मा. महापौर :-**

मी ते एक्सेप्ट केले नाही.

**अनिल सावंत :-**

तिन्ही विड्रॉ दिल्यानंतर ते हातामध्ये घेतले. त्याच्यानंतर तुम्ही त्यांना विचारले म्हणजे तुम्ही एकदा रिसिव्ह केले.

**मा. महापौर :-**

तुम्ही मला विड्रॉ दिले आणि मी मोजुन घेतले नाही आणि महत्वाचे म्हणजे मी ॲक्सेप्ट केले नाही.

**अनिल सावंत :-**

ॲक्सेप्ट नाही तुम्ही रिसिव्ह केले आणि प्रत्येकाला विचारले ना.

**मा. महापौर :-**

मी आता अजुन घोषित करणार आहे.

**अनिल सावंत :-**

घोषित नंतर करा तो तुमचा अधिकार आहे. पण एकदा तो फॉर्म रिसिव्ह केल्यानंतर तुम्ही प्रत्येक सदस्याला विचारले की, ही तुमची सही आहे का? इट मिन्स यु आर रिसिव्हड दि ॲप्लीकेशन विड्रॉअल्स त्यानंतर मा. मॉरस शेट म्हणतात की, ती माझी सही नाही. आमच्या ७ जणांसमोर त्यांनी सही केलेली आहे तुम्ही त्यांचा उमेदवारी अर्ज नामनिर्देशित पत्र तुमच्या जवळ आहे. ते तुमच्या जवळ आहे ते व्हेरीफाय करून बघा. कारण असे झालेले आहे की, ही मिटींग चालू व्हायच्या अगोदर तुमच्या ॲटीचेंबरमध्ये मॉरस शेट हे कोणाच्या तरी दबावाखाली येवून बोलतात की, माझे विड्रॉल्स नाही. ही परिस्थिती असु शकते. थोड्या वेळानंतर त्यांचे ब्रेन वॉश केले असेल. त्यांची चुक त्यांना कळून येईल तेव्हा तुम्ही कायद्याचा भंग करू नका. तुम्ही कायद्याप्रमाणे वागा.

**मा. महापौर :-**

पण ते नाहीच बोलतात ना.

**अनिल सावंत :-**

तो अधिकार पिठासिन अधिकाऱ्यांचा आहे. ॲप्लीकेशन रिसिव्ह केलेले आहे. त्याची व्हिडीओ रेकॉर्डींग झालेली आहे.

**जुबेर इनामदार :-**

पिठासीन अधिकारी साहेब, नामनिर्देशन पाठवताना त्यांनी जी सही केलेली आहे ती सही तुम्ही व्हेरीफाय करून बघू शकता. सहि केलेल्या उमेदवारांनी तुम्हाला तुमच्यासमोर एक विड्रॉअलचा फॉर्म दिलेला आहे. आज जर त्याला ते नाही बोलत असेल तर ते नाही होत नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पिठासिन अधिकारी साहेब, उमेदवार जो अर्ज भरतो त्यांनी उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी अर्ज भरला पाहिजे. आता सन्मा. सदस्य अनिल सावंत यांनी तुम्हाला मागे घ्यायचे अर्ज दिले. परंतु त्यांनी दिलेले आहेत. जे उमेदवार आहेत त्यांनी दिलेले नाहीत. क्ष्याच्यामुळे त्या उमेदवारांनी जर हरकत घेतली की, हे फॉर्म मी दिलेले नाही. तर प्रश्नच येत नाही. आणि दुसरी गोष्ट अशी की, सिग्निचर व्हेरीफिकेशनचे पुण्याला होते. त्यामुळे आपण ते व्हेरीफाय करू शकत नाही. त्याच्यामुळे तुम्ही ते व्हेरीफाय करू नका आणि ते जे उमेदवार म्हणतात की, मी सही केली नाही. उमेदवार अर्ज मी मागे घेतलेला नाही.

**तुळशीदास म्हात्रे :-**

सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील साहेब तुम्ही पिठासिन अधिकाऱ्यांना असा आदेश कशे देता.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मी आदेश देत नाही. साहेब मी फक्त त्यांना सजेशन दिलेले आहे. माझे मत मांडलेले आहे.

**अनिल सावंत :-**

सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील आपण आपल मत मांडा परंतु पिठासिन अधिकाऱ्यांनी ॲप्लीकेशन घेतल्यानंतर प्रत्येक सदस्याला ज्यांनी विड्रॉल्स जे फॉर्म दिले त्यांनी व्हेरीफाय केलेले आहे. त्यामध्ये मॉरस शेट सुद्धा......

**मा. महापौर :-**

जिथपर्यंत मी घोषित करत नाही तिथ पर्यंत....

**अनिल सावंत :-**

तो तुमचा अधिकार आहे. ते तुम्ही घोषित नंतर करणार पण प्रशस्ती सांगतात. त्यामध्ये सन्मा. सदस्य मॉरस शेट यांना तुम्ही विचारले की, तुमची सही आहे का? तर ते म्हणतात की, ती सही माझी नाही. मी एक स्थायी समितीचा सदस्य राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा सदस्य म्हणून सांगतो की, माझ्यासमोर मॉरस शेट ने सही केलेली आहे.

**जुबेर इनामदार :-**

मी ह्याची गवाही देतो की, माझ्यासमोर सही केली.

**शानु गोहिल :-**

माझ्यासमोर पण त्यांनी सही केलेली आहे मी पण हजर होते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, आम्ही पण गवाही देतो ना की, आमच्या समोर त्यांनी सहीच केली नाही. त्यांनी उमेदवारीचा अर्ज ते मागे घेवूच शकत नाही.

**जुबेर इनामदार :-**

ते तुमच्या पक्षाचे नाही ना मग तुम्हाला कसे माहित पडेल. नामनिर्देशन फॉर्म तुम्ही भरलेले नाही. आम्ही ते फॉर्म भरलेले आहे.

**हेलन गोविंद :-**

ते जर म्हणतात की, त्यांनी माघार घेतलेली नाही. तर नाही.

**शानु गोहिल :-**

असे होत नाही.

**हेलन गोविंद :-**

ते स्वतःहून माघार घेत नाहीत. तुम्ही त्यांना विचारा ना.

**अनिल सावंत :-**

सन्मा. सदस्य श्री. मॉरस शेट हे फार बिकट परिस्थितीतुन जात आहे. त्यांच्या भावना तुम्ही समजुन घ्या. त्यांनी जरी नाही सांगितले तरी त्यांनी ती सही केलेली आहे. तुम्ही ती सही व्हेरीफाय करून घ्या. पिठासिन अधिकारी साहेब तुम्ही चुकीचा निर्णय घेवू नका. या शहरामध्ये चांगला पायंडा पाडा उगाच दहशती खाली मॉरस रॉड्रीक्स साहेब आले असतील आणि एखादा निर्णय त्यांनी पुर्वी घेतलेला असेल आणि आता ते मान्य करीत नसतील हे थोड्यावेळा पुर्त असेल. तुम्ही समय सुचकता दाखवुन योग्य तो निर्णय घ्याल अशी अपेक्षा करतो.

**प्रविण पाटील :-**

मा. महापौर साहेब, वेळ झालेली आहे. तुम्ही निवडणूक प्रक्रिया चालू करावी.

**मा. महापौर :-**

७ फॉर्म आणि ६ उमेदवारी अर्ज आलेले आहे. आणि त्यासाठी तीन अर्ज मागे घेण्याचा अर्ज आलेला आहे. १) श्रीम. शानु गोहिल २) श्री. तुळशीदास म्हात्रे आणि ३) श्रीम. हेलन गोविंद या तिन्ही लोकांनी अर्ज देवून आपला उमेदवारी अर्ज मागे घेतलेला आहे. हे तिन्ही अर्ज स्विकारत आहे. आणि आता एकूण तीन उमेदवार राहिलेले आहे. १) श्री. मॉरस रॉड्रीक्स २) श्री. याकुब कुरेशी जी ३) श्री. प्रकाश ठाकूर जी सचिवांनी पुढच्या प्रक्रियेला सुरूवात करावी.

**नगरसचिव :-**

पिठासिन अधिकाऱ्यांनी घोषित केल्याप्रमाणे तीन अर्ज शिल्लक राहिलेले आहे. १) श्री. प्रकाश ठाकूर २) श्री. याकुब कुरेशी जी ३) श्री. मॉरस रॉड्रीक्स असे तीन अर्ज राहिलेले आहे. त्यांनी वर्णानुसार नावे लावलेली आहेत. प्रथम क्रमांक ठाकुर प्रकाश यांचे नाव दुसरे क्रमांक वर याकुब कुरेशी आणि तिसऱ्या क्रमांकावर मॉरस रॉड्रीक्स यांचे नाव राहिलेले आहे. यात तीन उमेदवारांची नावे आलेली आहे. ज्यामध्ये मी मतदानाच्या प्रक्रियेला हातवर करून हे करतो प्रथम मा. ठाकुर प्रकाश पांडूरंग यांचे नाव पुकारतो. ह्यांच्या बाजुने जे असतील त्यांनी हात स्पष्ट वर करायचे आहेत. कॅमेरा मॅन लक्ष द्यायचे आहे. श्री. प्रकाश ठाकुर यांच्या बाजुने एकही मत नाही. आता श्री. याकुब कुरेशी यांच्या बाजुने जे असतील त्यांनी आपले हात वर करून मतदान करायचे आहेत. श्री. याकुब कुरेशी यांच्या बाजुने १) श्री. याकुब कुरेशी, २) श्री. तुळशीदास म्हात्रे, ३) श्री. अनिल दिवाकर सावंत, ४) श्री. जुबेर अब्दुल्ला इनामदार, ५) श्री. मिलन म्हात्रे, ६) श्रीम. शानु गोहिल व ७) श्रीम. सुनिता कैलाश पाटील असे एकूण ७ (सात) सदस्यांनी हात वर करुन मतदान केलेले आहे हात खाली घ्यावे. तिसरे नाव श्री. मॉरस रॉड्रीक्स यांचे पुकारतो. ह्यांच्या बाजुने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. श्री. मॉरस रॉड्रीक्स यांच्या बाजुने १) श्री. मॉरस रॉड्रीक्स, २) श्री. ध्रुवकिशोर पाटील, ३) श्री. प्रकाश ठाकुर, ४) श्रीम. ग्रिटा फॅरो, ५) श्रीम. हेलन गोविंद, ६) श्री. सिंग मदन उदितनारायण ७) श्री. सिंग श्रीप्रकाश जिलेदार व ८) श्री. प्रविण मोरेश्वर पाटील असे एकूण ८ (आठ) सदस्यांनी हात वर करुन मतदान केलेले आहे. हात खाली घ्यावे. मा. पिठासीन अधिकाऱ्यांनी निकाल घोषीत करावा.

**मा. महापौर :-**

या निवडणूक प्रक्रियेमध्ये १५ सदस्य हजर आहेत त्यामध्ये मा. श्री. प्रकाश ठाकूर यांच्या बाजुने झिरो (निरंक) मतदान झालेले आहेत. आणि मा. श्री. याकुब कुरेशी यांच्या बाजुने ७ मते पडलेली आहे. श्री. मॉरस रॉड्रीक्स यांच्या बाजुने ८ मते पडलेली आहे. श्री. मॉरस रॉड्रीक्स यांना जास्त मते मिळाल्याने मी श्री. मॉरस रॉड्रीक्स यांना स्थायी समितीचे सभापती म्हणून घोषित करत आहे.

**प्रकरण क्र. ८५ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २१ पोटकलम (१) अन्वये सन २००८-०९ या सालाकरिता मा. स्थायी समितीवर असणाऱ्या सदस्यांपैकी एका सदस्याची सभापती स्थायी समिती म्हणून नेमणुक करणेबाबत.

**ठराव क्र. ७८ :-**

प्रकरण क्रमांक ८५ पाहता, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनिमय १९४९ मधील कलम २१ पोटकलम (१) अन्वये सन २००८-२००९ या सालाकरिता मा. स्थायी समितीवर असणाऱ्या सदस्यांपैकी एका सदस्याची सभापती स्थायी समिती म्हणून नेमणूक करावयाची आहे.

या नेमणूकीसाठी नामनिर्देशन पत्र मागविली असतां,

१) श्री. तुळशीदास दत्तात्रेय म्हात्रे
२) श्री. मॉरस जोसेफ रॉड्रीक्स
३) श्री. याकुब ईस्माईल कुरेशी
४) श्रीम. शानु जोरावरसिंग गोहील
५) श्री. ठाकूर प्रकाश पांडूरंग
६) सौ. गोविंद हेलन जॉर्जी

यांनी त्यांची नामनिर्देशनपत्रे दाखल केली.

वरील सहा उमेदवारांपैकी १) श्री. तुळशीदास दत्तात्रेय म्हात्रे २) श्रीम. शानु जोरावरसिंग गोहील ३) सौ. गोविंद हेलन जॉर्जी यांनी आज दिनांक ११/११/२००८ रोजी स्थायी समितीच्या सभेत निवडणुक प्रक्रियेस सुरुवात होणे अगोदर आपली उमेदवारी मागे घेतल्याने १) श्री. ठाकूर प्रकाश पांडूरंग २) श्री. याकुब ईस्माईल कुरेशी ३) श्री. मॉरस जोसेफ रॉड्रीक्स हे तिन उमेदवार शिल्लक राहिले आहेत. त्याकरिता सभापती, स्थायी समिती या पदाकरिता हात वर करुन मतदांन घेण्यांत आले.

त्यावेळी १) श्री. ठाकूर प्रकाश पांडूरंग यांना ०० इतकी मते आणि २) श्री. याकुब ईस्माईल कुरेशी यांना ०७ ३) श्री. मॉरस जोसेफ रॉड्रीक्स ०८ इतकी मते मिळाली. करिता वरील तिन उमेदवारांपैकी श्री. मॉरस जोसेफ रॉड्रीक्स यांना सर्वाधिक ०८ मते मिळाली असून ते विजयी झालेले आहेत.

तरी श्री. मॉरस जोसेफ रॉड्रीक्स यांची निवडून आल्याच्या दिनांकापासुन १ वर्षाच्या कालावधी करीता सभापती, स्थायी समिती या पदाकरिता मतदानाद्वारे निवड झाल्याचे मी जाहिर करीत आहे.

**सही/-**
**पिठासन अधिकारी,**
**स्थायी समिती,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मॉरस रॉड्रीक्स :-**

आपल्या सर्व सदस्यांनी मला जी मदत केली त्यांचे मी मनापासुन फार आभार व्यक्त करतो.

**मा. महापौर :-**

सभापती निवडून आले ते मी जाहिर करून आजची सभा संपली असे मी जाहिर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- सकाळी. ११.५५ वा.**

**पिठासीन अधिकारी तथा महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**